# बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर

## माहिती कक्ष, दिनांक २० नोव्हेंबर

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरन. व कलम** | : | ६४७/२०१७ भादंविसक २७९,३३७,३३८,३०४(अ),प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | १७/११/२०१७ रोजी चे २२.०० वा चे दरम्यान, ताई चौक ते कुमठा नाका रोडवर केंगनाळकर विटभट्टी समोरील रोडच्या फुटपाथ सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | १९/११/२०१७ रोजी १३.१० वा. |
| **फिर्यादी** | : | पोह/११३९/शहाजी भगवान दुधाळ,नेम.एमआयडीसी पोलीस ठाणे,सोलापूर शहर. |
| **आरोपीचे नांव** | : | सागर गौतम भस्मे,वय-२७,रा. दहिटणे ता. द. सोलापूर जिल्हा सोलापूर |
| **हकिकत** | | यात हकीकत अशी की,बाजुस नमुद तारखेस ,वेळी व ठिकाणी, यात आरोपी हा त्याचा मित्र नामे शुभम राजु चिंचोळकर याच्या मालकीचे मोटार सायकल क्रं. एमएच/१३/एयु-६२२९,स्पेंल्डर यावर मित्र नामे श्रीकांत शिवानंद पगडे वय २७, रा. हुडको कॉलनी घर नं.८४,कुमठा नाका सोलापूर यास डबलसीट बसवुन दारुचे अंमलाखाली भरधाव वेगाने निष्काळजीपणे हयगयीने मोटार सायकल चालुवन नमुद ठिकाणी रोडचे फुटपाथला धडक देवुन, स्वता: जखमी होणेस व मित्र श्रीकांत हा खाली पडुन डोकीस गंभीर मार लागुन मृत्यु होणेस कारणीभुत ठरला म्हणुन **तपास:- मपोसई/जाधव.** |

## सदरबाझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरन. व कलम** | : | ६२६/२०१७ भादंविसक ४५७,३८०,प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | १७/११/२०१७ रोजी २१.३० ते २२.३० वा चे दरम्यान,फिर्यादी चे राहते घरी-१२८,शानदार चौक शास्त्री नगर,सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | १९/११/२०१७ रोजी ००.५६ वा. |
| **फिर्यादी** | : | सनाउल्ला आताउल्ला खतीब,वय-२०,रा.सदर |
| **आरोपीचे नांव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | ३७,०००/- रु सोन्याचा ऐवज व रोख रक्कम |
| **हकिकत** | : | यात हकीकत अशी की,बाजुस नमुद तारखेस ,वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचा वरील ऐवज हा कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे बंद घराचे कडी उघडुन,आत प्रवेश करून,फिर्यादीचे संमत्तीशिवाय चोरून नेला म्हणुन.**तपास:- पोना/१२१२/जाधव.** |

## सदरबाझार  पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरन. व कलम** | : | ६२८/२०१७ भादंविसक ४५४,३८०,प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | १९/११/२०१७ रोजी १०.०० ते दुपारी ०३.४५ वा चे दरम्यान,फिर्यादी चे राहते घर-युनिटी क्लासिक अपार्टमेंट,प्लॉट नं.४०१,रेल्वे लाईन,सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | २०/११/२०१७ रोजी ००.१९ वा. |
| **फिर्यादी** | : | सौ.योगेश्वरी गोकुळ मवारे,वय-५२,रा. सदर |
| **आरोपीचे नांव** | : | अज्ञात चोरटा-नांव पत्ता माहित नाही. |
| **गेला माल** | : | **१. १,२५,०००/-रु चे सोन्याचे गंठण अंदाजे ५ तोळे वजनाचे.**<br>**२. १,२५,०००/-रु चे सोन्याची एक मोहन माळ अंदाजे ५ तोळे वजनाची दोन्ही बाजुस खरबुजी मण्याचे पदर व पेंडल असलेले**<br>**३. १,२५,०००/-रु चे सोन्याचे पाहे हार अंदाजे ५ तोळे वजनाची तीनपदरी**<br>**४. १,००,०००/-रु चे सोन्याचे ४ बांगडया अंदाजे प्रत्येकी एक तोळे वजनाची त्यावर गुलाबीखडयाचे डिझाईन असलेले**<br>**५. १,००,०००/-रु चे सोन्याचे ४ तोडे (जाड बांगडी)अंदाजे ४ तोळे वजनाचे**<br>**६. २५,०००/-रु चे सोन्याचे एक अंदाजे १० ग्रॅम वजनाचे लॉकेट**<br>**७. २७,५००/- रु चे एक सोन्याचे अंदाजे ११ ग्रॅम वजनाचे लॉकेट**<br>**८. ७५,०००/- रु चे एक सोन्याचा राणी हार अंदाजे ३ तोळे वजनाचे**<br>**९. ७५,०००/-रु एक कानातील जोड,व गळयातील खडयांचा डिझाईन असलेला सोन्याचा सेट अंदाजे ३ तोळे वजानाचे**<br>**१०. १२,५०० /- रु चे एक सोन्याची पिळयाची अंगठी अंदाजे ५ग्रॅमवजनाची.**<br>**११. ७,५००/-रु चे एक सोन्याची चौकोनी डिझाईन असलेली अंदाजे ३** |

| | | |
|---|---|---|
| | | **ग्रॅम वजनाची अंगठी.**<br><br>**१२. २२,५००/-रु चे एकुण सोन्याचे तीन जोड,वेगवेगळया डिझाईने टॉप्स**<br><br>**अंदाजे ९ ग्रॅम वजनाचे** |
| **हकिकत** | : | यात हकीकत अशी की,बाजुस नमुद तारखेस ,वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी या सासरी पंढरपूर येथे गेले होते.तेथुन गाठी-भेटी आटोपुन सोलापूर येथील राहते घरी आल्या नंतर घराचे सेप्टी दरवाजा ढकलला असता आतील दवरजाला कुलूपच नसल्याचे दिसले.व कुलूप लावण्याचा कोंयंडा अर्धवट तुटलेला दिसला.आत जावुन पाहिले असता,हॉल मधुन जाताना डावे बाजुचे बेडरुम मधील कपाट उघडे असल्याचे दिसले व दुसरे मुख्य बेडरुम कडे जावून पाहिले असता,त्याबेडरुम मधील लोखंडी कपाटाचे दार वरचे बाजुने कटावनीने वाकडे करूनउचकटुन उघडलेले दिसले व त्या शेजारी असलेले लाकडी कपाटाचे दरवाजे देखिल उघडे असल्याचे दिसले व दोन्ही कपाटातील आतील ड्रॉव्हर व लॉकर देखील उघडे असलेले दिसले व आतील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले व दोन्ही कपाटातील उघडे असलेले ड्रॉव्हर व लॉकर तपासुन पाहिले तेंव्हा फिर्यादीचे लक्षात आले की,सदर दोन्ही कपाटातील वरील ऐवज व ३२ तोळे ८ग्रॅम वजनाचे किंमत अंदाजे रु.८,२०,०००/-रु किंमतीचे सोन्याचे दागीने दिनांक १९/११/२०१७ रोजी सकाळी १०.०० ते १५.४५ वा चे दरम्यान,कोणीतरी अज्ञात चोरटयाने माझे नमुद घराचे दरवाजाचे कडीकोंयंडा तोडुन घरात प्रवेश करून चोरून नेले आहे म्हणुन.तपासः- सपोनि/पवळ. |